उद्यमे निवसती अर्थ ! ज्ञानात उद्यमता !!

# पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

## श्री संत सावता माळी ग्रामीण महविद्यालय

फुलंब्री, ता. फुलंब्री , जि. औरंगाबाद ४३११११

## मराठी विभाग

## अहवाल २०१९-२०

सहाय्यक प्राध्यापक,
डॉ. संजीवकुमार पांचाळ

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. राजश्री पवार

# मराठी विभाग

१) **अभ्यागत तासिका:-**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम सत्रात एक व द्वितीय सत्रात एक याप्रमाणे दोन अभ्यागत तासिकांचे आयोजन करण्यात आले होते. दि. १३ सप्टेंबर २०१९ रोजी डॉ. ज्योती स्वामी यांनी अभ्यागत तासिका घेतली. डॉ. ज्योती स्वामी (पं. नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय) यांनी प्रथम वर्षाच्या वर्गात काव्यात्म साहित्यातील केशवसुतांची "नवा शिपाई" या कवितेचे अध्यापन केले.

दुसरी अभ्यागत तासिका दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी डॉ.ललित अधाने (मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) यांनी तृतीय वर्षाच्या वर्गात साहित्य निर्मिती प्रक्रिया याविषयावर घेतली.

२) **भित्तीपत्रक:-** दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी डॉ. छाया महाजन (प्रख्यात मराठी लेखिका) यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच दुसरे भित्तीपत्रक दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजीललीत अधाने यांच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. मराठीच्या "बोली" वर आधारीत हे भित्तीपत्रक बनविण्यात आले होते.

३) **अभ्यास सहल:-**दिनांक १४ सप्टेंबर २०१९ रोजी भाषा विषयाची अभ्यास सहल बुद्ध लेणी व विद्यापीठ परिसर, तसेच दैनिक लोकमत समाचार या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.एकूण ३२ विद्यार्थी या सहलीमध्ये सहभागी झाले होते. बुद्ध लेणीला भेट दिल्यानंतर सर्व विद्यार्थी व प्राध्यापक दैनिक लोकमत समाचार कार्यालयास भेट देण्यासाठी जालना रोड, औरंगाबाद येथील लोकमत भवनकडे रवाना झाले. याठिकाणी कॉन्फरन्स हॉलमध्ये अमिताभ श्रीवास्तव (संपादक, दैनिक लोकमत) यांनी विद्यार्थ्यांशी एक तास संवाद साधला. यादरम्यान त्यांनी पत्रकारिता म्हणजे काय? पत्रकारिते समोरील आव्हाने व संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) **मातृभाषा दिवस:-** दिनांक २१ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात मातृभाषा दिवस साजरा करण्यात आला. डॉ. सुरेश मुंढे (हिंदी विभाग) यांनी "भारतीय भाषेतील वैविधता" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५) **मराठी भाषा सप्ताह:-** दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी २०२० या दरम्यान मराठी भाषा सप्ताह मानण्यात आला. या निमित्ताने विविध प्रकल्प राबविण्यात आले. दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी सप्ताहाचे उद्‌घाटन करण्यात आले. डॉ. अश्विन रांजणीकर हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते तर डॉ. संदीप जगताप हे अध्यक्षस्थानी होते. "मराठी भाषेचे वैशिष्ट्ये" याविषयावर डॉ. अश्विन रांजणीकर यांनी विवेचन केले. दि. २४ फेब्रुवारी २०२० रोजी बातमी लेखन कार्यशाळा घेण्यात आली. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना "बातमी लेखन : तंत्र, स्वरुप व उपयोजन" या विषयावर मार्गदर्शन केले. दि. २५ फेब्रुवारी २०२० रोजी "मराठीतून स्वाक्षरी" हा उपक्रम राबविण्यात आला. प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी उपस्थितांना मराठी स्वाक्षरीचे काही नमुने सादर केले. फलकावर अगोदर पूर्ण नाव लिहून दाखविणे व त्याअनुसार स्वत:ची स्वाक्षरी मराठीतून करणे,

त्यात काय सुधारणा अपेक्षित आहे? हे डॉ. पांचाळ यांनी समजावून सांगून काही नमूने स्वाक्षरीचे सादर केले.

६) **आंतरमहाविद्यालयीन कविता वचान स्पर्धा:-** चे आयोजन मराठी भाषा सप्ताहनिमित्त करण्यात आले होते. दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी स्पर्धा घेण्यात आली. यात एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील पुरस्कार विजेते: प्रथम, योगेश सोनवणे (यशवंत महाविद्यालय, सिल्लोड), द्वितीय, कु. मानसी पवार (प्रस्तुत महाविद्यालय), तृतीय, कु. दिपाली बोलकर (प्रस्तुत महाविद्यालय).

७) **मराठी भाषा गौरव दिन:**-दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने प्रा. डॉ. लिलित अधाने (मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) यांचे "मराठी भाषा : काल आणि उद्या"या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यांनी उपस्थितांना दीड तास सखोल मार्गदर्शन केले व मराठीला संतांचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे ती आजही तग धरुन आहे, असे विधान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. याप्रसंगी काव्यवाचन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

| | |
|---|---|
| सहाय्यक प्राध्यापक, | मराठी विभाग प्रमुख, |
| डॉ. संजीवकुमार पांचाळ | डॉ. राजश्री पवार |

मराठी विभाग अहवाल २०१९-२० – छायाचित्रे

अभ्यागत तासिका




प्रा. डॉ. ज्योती स्वामी (पंडित नेहरू महाविद्यालय औरंगाबाद)



प्रा. डॉ. ललित अधाणे (मुक्तांनंद महाविद्यालय गांगपूर)

भितीपत्रक




प्रा. डॉ. ललित अधाणे (देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद) यांच्या हस्ते भित्तीपत्रक विमोचन.




प्रसिद्ध लेखिका छाया महाजन यांच्या हस्ते भित्तीपत्रक विमोचन.

अभ्यास सहल



लोकमत भवन औरंगाबाद येथे भेट



बुद्धलेणी औरंगाबाद

## मराठी भाषा सप्ताह





मराठीतून स्वाक्षरी उपक्रम डॉ. संजीवकुमार पांचाळ मार्गदर्शन करताना.



डॉ. संदीप जगताप विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



डॉ. अश्विन रांजनिकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



बातमी लेखन कार्यशाळा डॉ. संजीवकुमार पांचाळ मार्गदर्शन करताना.

## मराठी भाषा गौरव दिन




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रा. डॉ. ललित अधाणे (मुक्तांनंद महाविद्यालय गांगपूर) मार्गदर्शन करताना.